महाराष्ट्र शासन

# उप वनसंरक्षक, अलिबाग यांचे कार्यालय, अलिबाग

"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे"

मु.पो.हिराकोट तलावाजवळ अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड पी.नं. 402 201

दूरध्वनी क्र 02141-222016/222216 Email ID:dycfalibag@mahaforest.gov.in

जावक क्रमांक: ब/20/जमिन/ 520 /2020-21. दिनांक:26 /06/2020.

प्रति,

कार्यकारी अभियंता,
एम.एस.आर.डी.सी, मुंबई
बांद्रा रेक्लेमेशन बस डेपोच्या समोर,
लिलावती हॉस्पीटल, जवळ के .सी मार्ग
बांद्रा(पश्चिम), मुंबई-400 050.

विषय:- **Forest Land Raigad**
Rehabilitation & Up-gradation of Shahapur Patgaon Section 2- (43.783 to 69.508 Km) part of NH-3 Shahpur – Murbad-Mhasa-Karjat-Khopoli-NH4 section of newly declared NH-4 section of newly declared NH-548A in the state of Maharashtra on EPC mode.

संदर्भ:- 1) या कार्यालयाचे पत्र क्र. ब/20/जमिन/ 5226 दिनांक 13/03/2019.
2)आपलेकडील पत्र क्र.NH-2019/02/DE/C.RNo.P-S/ENGG/3610, दि.03/06/2019.
3) या कार्यालयाचे पत्र क्र. ब/20/जमिन/1660, दिनांक 29/06/2019
4) आपलेकडील पत्र दिनांक 22/07/2019.
5) या कार्यालयाचे पत्र क्र. ब/20/जमिन/2485, दिनांक 28/08/2019.
6) आपलेकडील पत्र दिनांक 24/09/2019.
7) या कार्यालयाचे पत्र क्र. ब/20/जमिन/3185, दिनांक 24/10/2019.
8)आपलेकडील पत्र क्र.NH-2019/02/DE/C.RNo.P-S/ENGG/7265,दि.27/11/2019.
9) या कार्यालयाकडील पत्र क्र. ब/20/जमिन/3185, दिनांक 01/01/2020.
10) आपलेकडील पत्र क्र. NH-2019/02/DE/C.RNo.P-S/ENGG/100,दि.04/01/2020. (दिनांक 27/01/2020 रोजी प्राप्त)
11) या कार्यालयाकडील पत्र क्र. ब/20/जमिन/490, दिनांक 19/06/2020.
12) आपलेकडील पत्र क्र. NH-2020/02/DE/C.RNo.P-6/ENGG/Forest Proposal, दि. 23/06/2020.

विषयांकीत रस्त्याचे रुंदीकरण व मजबूतीकरणाकरीता वन जमिन मागणीचा प्रस्तावामध्ये या कार्यालयाचे पत्र क्र. 11 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या त्रुटींचे अनुषंगाने सुधारीत प्रस्ताव या कार्यालयास दाखल केला आहे.

सदर प्रस्ताव या पूर्वी संदर्भिय पत्र क्र. 10 अन्वये दाखल केलेल्या प्रस्तावाची पडताळणी केली असता खालील बाबी निदर्शनास येत आहेत.

1. सदर प्रस्तावाची छाननी केली असता आपेकडील संदर्भिय पत्र क्र. 10 अन्वये एकूण 12.971 हेक्टर वनजमिन मागणीचा प्रस्ताव दाखल करण्यात आलेला होता. तसेच दिनांक 15/6/2020 रोजी 12.971 हेक्टर एवढयाच क्षेत्राचा प्रस्ताव ऑनलाईन प्रणालीवर देखील दाखल करण्यता आलेला होता. तथापी आता सुधारीत प्रस्ताव सादर करताना तो 11.421 हेक्टरचा दाखल करण्यात आलेला आहे. तरी मौजे पोही, नढाळ, कशेळे, टाकवे या गावांतील वनक्षेत्राची मागणी कमी होण्याबाबत/काही सर्व्हे नंबरचे क्षेत्र वगळणेबाबत सर्व्हे नंबर निहाय सविस्तर खुलासा करावा. जेणेकरुन क्षेत्राची अंतीमतः निश्चिती करता येईल.

2. प्रस्तावांत क्षेत्रविवरण तक्त्यांतील ही सर्व्हे नंबर निहाय क्षेत्राची बेरीज घेतली असता क्षेत्र विवरण तक्त्यांत नमुद केलेली बेरीज यामध्ये फरक दिसून येत आहे. तरी याबाबत खात्री करणेत यावी व अचूक क्षेत्राची बेरीज दर्शविण्यात यावी. (क्षेत्र विवरण तक्तयांत चार डिजीटस् पर्यंत क्षेत्र दर्शविण्यात यावे.

3. क्षेत्रविवरण तक्ता व नकाशांवर देण्यात येणारे क्षेत्र विवरण यामध्ये वनक्षेत्राचा तपशील एकच असेल याबाबत देखील खात्री करणेत यावी.

4. प्रस्तांवात विहित केलेली 1 ते 57 बाबींची चेकलिट सामील करण्यात यावी.

5. प्रस्तावांत नॉन इंडेनमिटी प्रमाणपत्रावर प्रकल्प यंत्रणेचे प्राधिकृत अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. तरी स्वाक्षरी असलेले प्रमाणपत्र प्रस्तावांत सामील करावे.

6. सदर प्रकल्पाचे काम विनापरवाना वनक्षेत्रांत झाल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे सदर प्रस्ताव केंद्रशासनाकडे सादर करताना विहित नमुन्यांतील वनभंग अहवाल (Violation Report) प्रस्तावांत सादर करणे आवश्यक आहे. तरी सदर अहवाल प्रस्तावांत सामील करण्यात यावा.

7. प्रस्तावांत रस्त्याचा क्रॉससेक्शन प्लॅन जोडण्यात यावा.

8. प्रस्तावातील प्रमाणे पत्र क्र. 32 नुसार प्रस्तावांत प्रशासकीय व तात्रीक मान्यतेबाबत दस्तऐवज जोडण्यात आलेचे नमुद आहे तथापी सदर आदेश प्रस्तावांत सामील केलेले दिसून येत नाही.

9. प्रस्तावांत सादर केलेले प्रोजेक्ट नोटवर प्रस्ताव सादर करणा-या प्राधिकृत अधिकारी यांची स्वाक्षरी दिसून येत नाही.

10. प्रस्तावांत आपण पर्यायी वनेत्तर क्षेत्राबाबत काहीही नमुद केलेले नाही. आपले म्हणण्यानुसार सदर प्रस्ताव राष्ट्रीय महामार्गाचा असल्याने सदर प्रस्तावांमध्ये पर्यायी वनेत्तर क्षेत्राची आवश्यकता नाही. तथापी सदर प्रसताव हा राज्य शासनाचे यंत्रणेकडून कार्यान्वीत असल्याने त्यामध्ये पर्यायी वनेत्तर क्षेत्राची आवश्यकता आहे याबाबत यापूर्वीच आपणास अवगत करण्यात आलेले आहे. करीता सदर प्रस्तावांत जर केंद्रशासनाकडून/

वरीष्ठांकडून पर्यायी वनेत्तर क्षेत्र देणेबाबत कळविण्यात आले तर पर्यायी वनेत्तर क्षेत्र उपलब्ध करुन देणेबाबतचे बंधनपत्र (Undertaking) प्रस्तावांत सामील करण्यता यावे.

11. प्रस्तावांतील क्षेत्र अतिम झालेनंतर त्यानुसार ऑनलाईन प्रस्तावांतील क्षेत्रामध्ये व त्यासमवेत सादरकरणेत आलेल्या दस्तऐवजामध्ये बदल करणे आवश्यक आहे. याकरीता सदर प्रस्ताव ऑनलाई व कागदोपत्री आपणास या सोबत जोडून परत करण्यात येत आहे.

तरी वरील प्रमाणे त्रुटींची परिपूर्ण पूर्तता करुन प्रस्ताव या कार्यालयास सादर करणेची कार्यवाही करावी.

(मनीष कुमार)
उप वनसंरक्षक,
अलिबाग.

प्रतिलिपीः- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे माहितीसाठी सादर.

प्रतिलिपीः- मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांचेकडे माहितीसाठी सादर.

प्रतिलिपीः- जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग यांचेकडे माहितीसाठी अग्रेषित.

प्रतिलिपीः- अधिक्षक अभियंता (एनएच), महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ लि. आरजीएसएल प्रोजेक्ट ऑफिस, बांद्रा (पश्चिम), मुंबई-50 यांचेकडे माहितीसाठी अग्रेषित.

प्रतः- सहा. वनसंरक्षक, पनवेल व सहा. वनसंरक्षक (अधिसंख्य) कर्जत यांचेकडे माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.

2/- त्यांनी बाधीत होणारे वनक्षेत्रांत कीती वृक्षांची तोड होणारे आहे याबाबतचे अंदाजपत्रक आठ प्रतीत या कार्यालयास तात्काळ सादर करावे. तसेच प्रस्तावांत वनक्षेत्रांत कीत क्षेत्रांवर प्रकल्प यंत्रणेकडून वनभंग करुन काम करणे आलेले याचा तपशील व त्यांचेवर नोंदविण्यात आलेले गुन्हे व त्यावर केलेली कारवाई याबाबतचा अहवाल या कार्यालयास तीन दिवसांत या कार्यालयास सादर करावा.

प्रतः- परिक्षेत्र वन अधिकारी, कर्जत (पश्चिम), कर्जत (पूर्व) यांचेकडे माहितीसाठी रवाना.